ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II | ISSUE-II | Feb. | 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# शिक्षक प्रशिक्षणातील उपक्रमशिलता

**श्री.नरवडे उमेश अच्युत**
श्री.शंकरराव काळे अध्यापक विद्यालय,
MIDC लातूर.

**प्रस्तावना :**

अभ्यासक्रम कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या अंतरंगाचा कल समजण्यास मदत होते.कारण,अभ्यासपूरक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती मिळते.म्हणून अभ्यासपूरक कार्यक्रमाना महत्व आहे.

**व्याख्या :**

शाळा हे केवळ औपचारीक शिक्षण देणारे केंद्रच नाही. तर अशा प्रकारची मुर्त जाती आहे. की,शिष्याना प्रशिक्षीत करून त्यांना सन्मानपूर्ण शिक्षण देईल. विद्याग्रहण करणे हेच सर्वस्वाही.सामाजिक जीवनात एक दुसऱ्याला मदत करण्याने स्वभाव परिवर्तन होवू शकते असे नाही तर याची पूर्ती या पाठयपूरक कार्यक्रमानीच होण् शक्य आहे.

\- मुदलीयार आयोग

वरील व्याख्येच्या आधाराने आपणाला पुढे असे म्हणता येईल,ज्या क्रीया,कृ ती केल्यामुळे विद्यार्थ्याचा शारीरिक,मानसिक,भौतिक ,भावनिक विकास म्हणजेच सर्वांगिण विकास साधण्याचा प्रयत्न होतो. त्याला अभ्यासपूरक कार्यक्रम असे म्हणतात.

**अभ्यासपूरक कार्यक्रमाचे महत्व :**

**१. शारीरिक महत्व :**

विद्यार्थ्याच्या शारीरिक शक्तीचा विकास याव्दारा होतो.

उदा:विविध खेळ,प्राणयाम इ. स्वस्थ शरीरासाठी आवश्यक असते.यातूनच शक्ती,सहनशिलता,सहकार्यवृत्ती वाढीस लागते.

**२.मनोवैज्ञानिक महत्व :**

अभ्यासपूर्वक कार्यक्रमातून अंत प्रेरणेची अभिव्यक्ती होते.या प्रेरणेला योग्य वाट मिळाली नाही तर उपद्रव्याचे कारण बनते. युवावस्थेतील मुलांच्या मौन-भावना या शारीरिक कार्यक्रम परावर्तीत केल्या जातात.अभ्यासपूर्वक कार्यक्रमाने मानसिक संतूलन राहते.

**३.भौतिक महत्व :**

या कार्यक्रमामुळे समुहाप्रती आज्ञापालनाची सवय लागते. सत्य,अहिंसा,प्रेम,न्याय या भावना वाढीस लागतात.

**४.नागरीक महत्व :**

शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृ ती आहे.त्यामुळे येथील प्रत्येक कार्य,कार्यक्रम समाजाशी संबंधित होवू शकले पाहीजे.

उदा :स्वयंशासन,स्कूल पंचायत ,संघटन ,महोत्सव.

**५.सामाजिक महत्व :**

सहकार वृत्ती वाढीस लागते,समुहाप्रती प्रेम व सहकार्य वृत्ती वाढते. राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लावली जाते.

उदा :श्रमदान,ग्रामोद्योग ,धार्मिकसण एकत्रित साजरे करणे.

**६.सौंदर्यात्मक अथवा रसात्मक महत्व :**

जॉन किटसच्या मते सौंदर्यपूर्ण वस्तू नेहमी सुखदायी असते. विद्यार्थ्यांना सौंदर्यबोध करणे आणी त्यात रसात्मक भाव निर्माण करणे हा शिक्षणाच्या उद्देश आहे.

उदा :चित्रकला,मुर्तीकला ,मातीचे खेळणे ,कार्डबोर्ड बणविणे,संगीत,नृत्य,ललीत कला याव्दारे सौंदर्यात्मक व रसात्मक वृत्ती वाढीस लागते.

**७.सांस्कृतिक महत्व :**

सांस्कृतिक परंपरा समजण्यास मदत होते.

उदा :नाटक दृश्यविधान,लोकनृत्य,लोकसंगीत,धार्मीक व सामाजिक उत्सव याव्दारे सांस्कृतिक अभिरूची निर्माण होते.

**८.मनोरंजन पुरक महत्व :**

शाळेतील मोकळया वेळेचा उपयोग होतो जीवनाला सापडलेले मधुर संगीत म्हणजे तत्वज्ञान

- पायथागोरस.मनोरंजानातून बौध्दीक,नैतिक,स्वास्थ राहते हे शिकवण्याचे आज गरज आहे.

**९.साहित्यीक महत्व :**

साहीत्य म्हणजे मानवी जीवनाचा आरसा होय

उदा :साहीत्यीक मंडळातून प्रेरणा मिळते. महापरूषांची जीवन चरित्रपट,जयंत्या साजऱ्या करणे.

**१०.अनुशासनात्मक महत्व :**

या कार्यक्रमाव्दारे स्वात्म अनुशासन शिकतो. कार्यक्रमाशी,संबंधित नियमाचे पालन करण्यास विद्यार्थी शिकतात.त्याचबरोबर स्वत:वर नियंत्रण ठेवायला शिकतात.

**अभ्यासवृत्ती कार्यक्रमाचे प्रकार :-**

**१.शारीरिक विकासास उपयुक्त.**

उदा :पोहणे,मैदानी खेळ,सायकलिंग करणे,क्रीडांगण म्हणजे छत नसलेली शाळा,याची प्रचिती येते.

**२.बौध्दीक विकासास उपयुक्त.**

उदा : वाद-विवाद,लेखन-वाचन,स्पर्धा,भित्तीपत्रीका,परीसंवाद विषय अभ्यासमडंळे.

**३.कलागुणाच्या विकासास उपयुक्त.**

उदा :आपल्या आवडीप्रमाणे विद्यार्थी संगीत,नाटय नृत्य,हस्तकला,पुठ्ठकाम,कलाप्रदर्शन,भूगोल,विज्ञान प्रदर्शन इ.

**४.नैतिक विकासास उपयुक्त.**

उदा :सामुदायीक प्रार्थना,थोर पुरू षांचे जन्मदिन व पुण्यतिथ्री,राष्ट्रीय व सामाजिक रूढी,वनमहोत्सव हे कार्यक्रम नैतिक विकासास पूरक ठरतात.

**५.नागरिकत्वाच्या विकासास उपयुक्त.**

उदा : स्वयंशासन,मंडळे,शालेय बँक चालविणे,वस्तू भांडार चालविणे,यात्रा,उत्सव इ.साक्षरता प्रसार करणे. संकटमयी आपत्तीग्रस्ताना मदत करणे इ. यातून नागरिकत्वाचा विकास होतो.

**६.सृजनात्मकतेच्या विकासास उपयुक्त.**

उदा : बाग लावणे,नियतकालिकात लेखन,प्रयोगशिला वृत्ती,निर्मिती यातून सृजनशिलता वाढते.

**अभ्यासपूरक कार्यक्रमाचे फायदे:**

- बौध्दीक विकासास मदत होते.
- सहज प्रवृत्तीचे उदात्तीकरण होते.
- शारीरिक विकासात मदत शिस्तबध्दता येते.
- शिस्तबध्दता येते.
- शाळेविषयी आपलेपणा वाटतो.
- रिकाम्या वेळेचा सदुपयोग.
- सामाजिकतेचे प्रशिक्षण मिळते.
- नेतृत्वाचे प्रशिक्षण मिळते.
- व्यवसायनिवडीस मदत होते.
- चारित्र्याची घडण होते.

## अभ्यासपूरक कार्यक्रमाची मार्गदर्शक तत्वे:

१.कार्यक्रमाची  सांगड अभ्यासक्रम विषयाशी घालावी.
२.विविधता व भिन्न अभिरूची पोषण केले जावे.
३.विद्यार्थ्याच्या उपक्रमाशिलतेला वाव देण्यात यावा.
४.कार्यक्रमामध्ये मोजकेपणा नेटकेपणा असावा.
५.कार्यक्रम घेताना त्याची नोंद घेउन मूल्यमापन केले जावे.
६.कार्यक्रम शाळेच्या वेळात घेण्यात यावा.

## अभ्यासपूरक कार्यक्रमात शिक्षकाची भूमिका :

१.अभ्यासपूरक कार्यक्रम निश्चिती करावी.
२.उत्तम मार्गदर्शनाचे काम करावे.
३.कुवतीनुसार विद्यार्थ्यांना कामे द्यावी
४.निकोप स्पर्धेसाठी उत्तेजन द्यावे
५.चुका शिका पध्दतीने सराव घ्यावा .
६.विविधता व व्यापकतेने कार्यक्रम यशस्वी करावा.
७.निरंतर मूल्यमापन पध्दती वापरावी.
८.लाजाळू विद्यार्थ्यांना कार्यक्रमात सहभागी करून घ्यावे.
९.समाज व संघटनेचे कार्यक्रमासाठी सहकार्य घ्यावे.
१०.शाळा/महाविद्यालयातील सर्वांना सहभागी करून घ्यावे.

## संदर्भ ग्रंथ :

शालेय व्यस्थापन शैक्षणीक संरचना
आणी आधुनिक विचार प्रवाह -डॉ.सौ.के.नागतोडे.